# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक -१

## सभावृत्तांत

दिनांक - ०७.०४.२०१२ वेळ - दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा शनिवार, दिनांक ७.४.२०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.अनुपकुमार यादव,अति.आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका,पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. अविनाश (दादा) टेकावडे
२. मा. चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३. मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
४. मा. छाया जगन्नाथ साबळे
५. मा. जम सोनाली पोपट
६. मा. सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७. मा. पाडाळे निता विलास
८. मा. जावेद रमजान शेख
९. मा. जगदीश शेट्टी
१०. मा. जगताप नवनाथ दत्तु
११. मा. ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१२. मा. भोसले राहुल हनुमंतराव
१३. मा. चोंधे आरती सुरेश
१४. मा. भालेकर अरुणा दिलीप
१५. मा. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
१६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.कदम-अति.आयुक्त,मा.गावडे-सहा. आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.अति.आयुक्त-सन्मा.सदस्य, मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत
(पिठासीन अधिकारी) करतो. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुकक्मार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

मा.नगरसचिव- मा.स्थायी समितीचे सभापती पदावर मुं.प्रां.म.न.पा. अधिनियम १९४९ चे क्कलम २१ (१) नुसार, नेमणुकक्करणेकामी एकुण ४ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | जगदीश शेट्टी | अविनाश (दादा) टेकावडे | जावेद रमजान शेख |
| २) | जगदीश शेट्टी | छाया जगन्नाथ साबळे | भालेकर अरुणा दिलीप |
| ३) | जगताप नवनाथ दत्तु | जम सोनाली पोपट | पाडाळे निता विलास |
| ४) | जगताप नवनाथ दत्तु | विनया प्रदिप (आबा) तापकीर | चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके |

[ मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त एकूण ४ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासिन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासिन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली. ]

मा.अति.आयुक्त- मा.स्थायी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या
(पिठासीन अधिकारी) उपरोक्त एकुण ४ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती सर्व नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. सभापती स्थायी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१) जगदीश शेट्टी
२) जगताप नवनाथ दत्तु

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासिन अधिकारी यांजकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

[मा.पिठासिन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दु.१२=१० ते दु.१२=२५ हा १५ मिनिटांचा अवधी संपला.]

मा.अति.आयुक्त- (पिठासीन अधिकारी) उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये जगताप नवनाथ दत्तु या उमेदवाराने त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन अधिकारी यांजकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेतली आहे. स्थायी समितीचे सभापती पदाकरिता निवडणुकक्लढविणारे जगदीश शेट्टी हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

---------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक - ७.४.२०१२ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या ४ नामनिर्देशन पत्रांमधील २ उमेदवारांपैकी जगताप नवनाथ दत्तु या उमेदवाराने त्याची उमेदवारी रितसर मागे घेतलेली असल्यामुळे मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे जगदीश शेट्टी हे एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.जगदीश शेट्टी** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त, (विशेष) पुणे म.न.पा.
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती **मा.जगदीश शेट्टी** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

---------

ठराव क्रमांक :- २ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०७.०४.२०१२
सूचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.निता पाडाळे

मा.स्थायी समितीची सभा प्रत्येक सप्ताहात मंगळवारी दुपारी ३.०० वाजता भरविणेत यावी. तथापि मंगळवारी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/ सुट्ट्यानंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दु.३:०० वाजता सभा भरविणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(**जगदीश शेट्टी**)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/५२७/१२
दिनांक - ०७/०४/२०१२ चे लगत

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.